**जा.क्र.पोआ/४८४९/२०२१**
**पिंपरी चिंचवड**
**दिनांक २३.०४.२०२१**

**विषय : कोरोना विषाणू ( कोविड – १९ ) संसर्ग साखळी तोडण्यासाठी “Break The Chain” प्रतिबंधात्मक आदेश.**

संदर्भ: १) शासन परिपत्रक क्रमांक - समय २०२०/प्र.क्र. ३५/१८ (रा.व.फा.) दिनांक०७/०४/२०२०

२) मा. विभागीय आयुक्त (पिंपरी चिंचवड) कार्या क्रासा.प्र.१/आरआर/१०२४/२०२० यांचे दिनांक : २८/०८/२०२० रोजीचे पत्र.

३) अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग,गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल मंत्रालय, मुंबई, क्रमांक कोरोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य - ५, दिनांक १४ मार्च २०२०

४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५,

५) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

६) महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र. महसूल व वन विभाग (**DMU/2020/CR.92/DISM,1**) दिनांक १७ एप्रिल २०२०, २१ एप्रिल, २९ जुन २०२०, ६ जुलै २०२०, ३१ जुलै २०२०, ३१ ऑगस्ट २०२०, ३० सप्टेंबर २०२०, १४ ऑक्टोबर २०२०, २९ ऑक्टोबर २०२०, ३ नोव्हेंबर २०२०, १४ नोव्हेंबर २०२०, २३ नोव्हेंबर २०२०, २७ नोव्हेंबर २०२०, २१ डिसेंबर २०२०, २४ डिसेंबर २०२०, २९ डिसेंबर २०२०, १४ जानेवारी २०२१, १० फेब्रुवारी २०२१, १५ मार्च २०२१, २७ मार्च २०२१,०४ एप्रिल २०२१, १३ एप्रिल २०२१, २० एप्रिल २०२१, २१ एप्रिल २०२१

७) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे आदेश जा. क्र. वैद्य /०९ /कावि /१२९६ /२०२१ दि. १४ एप्रिल २०२१, क्र. वैद्य/०९/कावि/१३१७/२०२१ दि. १७ एप्रिल २०२१, क्र, वैद्य/०९/कावि/१३२१/२०२१दि. २०/०४/२०२१

आदेश,

ज्याअर्थी उपरोक्त संदर्भ क्र. ६ मधील आदेशान्वये राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात कोविड १९ या आजाराच्या प्रसारास प्रतिबंधीत करण्यासाठी उपाययोजना व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

ज्याअर्थी, सदर अधिनियमांतर्गत राज्यात कोरोना विषाणूमुळे उद्धवलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत, महाराष्ट्र कोविड - १९ उपाययोजना नियम २०२० अन्वये कोविड - १९ च्या प्रसारास पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना प्राधिकृत केलेले

आहे. साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **मी, कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड**, पिंपरी चिंचवड **पोलीस आयुक्तालयाच्या** संपुर्ण कार्यक्षेत्रा मध्ये दिनांक २२.०४.२०२१ रोजी सायंकाळी ०६.०० पासून ते १ मे २०२१ सकाळी ०७.०० वाजेपर्यंत खालील प्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करीत आहे.

१) **कार्यालयातील उपस्थिती –**

अ) सर्व शासकीय कार्यालये ( राज्य, केंद्र आणि स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्यारितील ) अत्यावश्यक सेवेशी संबंधित कार्यालये वगळता कर्मचाऱ्यांच्या १५% उपस्थितीत सुरु राहतील.

- **उपरोक्त कार्यालये / आस्थापना यांना यापेक्षा जास्त कर्मचारी उपस्थित असणे आवश्यक असल्यास संबंधित आस्थापना प्रमुख यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाची परवानगी घ्यावी.**

ब) **पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रासाठी निर्गमित केलेल्या दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या आदेशातील** मुद्दा क्र. ५ ( **Exemption Category** ) मध्ये नमूद सर्व कार्यालये १५% किंवा ५ यापैकी जे जास्त असतील तेवढ्याच अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीत सुरु राहतील.

क) **पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रासाठी निर्गमित केलेल्या दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या आदेशातील** मुद्दा क्र.२ ( **Essential Category** ) मध्ये नमूद सर्व अत्यावश्यक सेवांची कार्यालये कमीतकमी आवश्यक कर्मचारी उपस्थितीत सुरु राहतील. मात्र कोणत्याही परिस्थितीत कर्मचारी उपस्थिती ५०% पेक्षा जास्त असणार नाही. अत्यावश्यक सेवा ( **Essential** Services ) प्रत्यक्ष पुरविण्याच्या कामी किमान मनुष्यबळ वापरावे. आवश्यकतेनुसार यामध्ये १००% पर्यंत वाढ करण्यास मुभा राहील.

२) **लग्न समारंभ –**

➢ लग्न समारंभ कार्यक्रम जास्तीत जास्त २५ लोकांच्या उपस्थितीत केवळ २ तासांच्या कालावधीत एकच कार्यक्रम व एकाच हॉलमध्ये साजरा करणेस परवानगी राहील. सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वर / वधू पक्षावर रक्कम रुपये ५०,०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित हॉल किंवा लग्न समारंभाचे ठिकाण यांचेकडून नियमांचा भंग झाल्यास मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येतील.

३) **खाजगी प्रवासी वाहतूक –**

- खाजगी बस वगळता इतर खाजगी प्रवासी वाहतूक आपत्कालीन व अत्यावश्यक कारणासाठी किंवा इकडील दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या आदेशात नमूद केलेनुसार वैध कारणांसाठी आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. सदर संबंधित वाहन चालक / मालक हे ज्या ठिकाणी राहतात तेथेच वाहतूक करणे अपेक्षित आहे. यामध्ये आंतर-जिल्हा किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवासी वाहतूक करणे अपेक्षित नाही.

- आंतर-जिल्हा किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करण्यास खालील वैध कारणांसाठीच परवानगी राहील. याव्यतिरिक्त इतर कारणास प्रवास करणेस संपूर्णतः प्रतिबंध राहील.
  १) इकडील दिनांक १४.०४.२०२१ रोजीच्या आदेशात नमूद अत्यावश्यक सेवा ( **Essential Service** )
  २) वैद्यकीय आपत्कालीन प्रसंग असल्यास
  ३) अंत्यसंस्कार
  ४) कुटुंबातील व्यक्तींना गंभीर स्वरूपाचा आजार असल्यास

- सदर नियमांचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर रक्कम रुपये १०,०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

- आंतर जिल्हा किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करणेबाबतची नियमावली पोलीस प्रशासनामार्फत स्वतंत्र निर्गमित करण्यात येईल त्याचे काटेकोरपणे पालन करावे.

- खाजगी बस आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील. प्रवाश्यांना उभे राहून प्रवास करता येणार नाही.

- आंतर-जिल्हा किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात प्रवास करणेसाठी खाजगी बस यांनी खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील –

    - खाजगी बसेस चे वेळापत्रकानुसार एका शहरात फक्त दोन बस थांब्यांवर बस थांबवता येईल. बसचे वेळापत्रक बस सेवा पुरविणाऱ्या ठेकेदारांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाला वेळोवेळी कळवावे. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभाग खाजगी बसेस च्या वेळापत्रकात आवश्यकतेनुसार हवे ते बदल सुचवू शकतील.

- खाजगी बसने आंतर जिल्हा प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या हातावर १४ दिवस **Home Quarantine** बाबतचा शिक्का संबंधित आस्थापना चालकांनी मारणे बंधनकारक आहे.
- सर्व बस थांब्यांवर थर्मल गन ( **Thermal Scanner / Gun** ) याद्वारे तपासणी करण्याची व्यवस्था करण्यात यावी. जर प्रवाश्यांमध्ये कोविड -१९ ची लक्षणे आढळून आल्यास अशा प्रवाश्यांना त्वरित जवळील कोविड केअर सेंटर किंवा रूग्णालय यामध्ये स्थलांतरित करण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- स्थानिक आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी सर्व बस थांब्यांवर पिंपरी चिंचवड **पोलीस आयुक्तालयाच्या हददीत** येणाऱ्या प्रवाश्यांचे **Rapid Antigen Test ( RAT )** करणेकरिता मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतील ( Testing Lab ) तंत्रज्ञांची नियुक्ती करावी. कोविड – १९ चाचणी करिता लागणारा खर्च हा संबंधित आस्थापना / प्रवाशी यांनी करावा.
- सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना चालका विरुद्ध रक्कम रुपये १०,०००/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनाचे परवाना रद्द करून मे. केंद्र शासन कोविड-१९ आपत्ती संपूर्णपणे संपली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येईल.

४) **सार्वजनिक प्रवासी वाहतूक –**

अ) **पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रात खालील नमूद आस्थापनावरील अधिकारी / कर्मचारी यांनाच लोकल रेल्वेने प्रवास करण्यास परवानगी राहील.**

- सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी ( केंद्र, राज्य, स्थानिक प्राधिकरण ) यांना सोबत ओळख पत्र असल्यास पास / तिकीट देण्यात यावे.
- सर्व वैद्यकीय सेवा/ सुविधा पुरविणारे ( **Doctors, paramedics / lab technicians / hospital and medical clinic staff etc.** ) यांना सोबत अधिकृत ओळख पत्र असल्यास पास / तिकीट देण्यात यावे.
- वैद्यकीय उपचाराची आवश्यकता असणारी व्यक्ती तसेच अपंग व्यक्ती व त्यांच्या मदतीला एक मदतनीस यांना.

ब) पिंपरी चिंचवड **पोलीस आयुक्तालयाच्या** क्षेत्रातील सार्वजिक वाहतूक व्यवस्था ( PMPML ) अत्यावश्यक सेवेसाठीच आसन क्षमतेच्या ५०% क्षमतेने सुरु राहतील

क) आंतर-जिल्हा किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या रेल्वे व बसेस
**( MSRTC )** यांनी खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे –

- पिंपरी चिंचवड **पोलीस आयुक्तालयाच्या** क्षेत्रात रेल्वे अथवा बसने ( MSRTC ) प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांची माहिती रेल्वे प्रशासन तथा MSRTC प्रशासन यांनी वेळोवेळी आपत्ती व्यवस्थापन विभागास देण्याची व्यवस्था करावी.
- सर्व रेल्वे स्थानकावर व बस थांब्यांवर थर्मल गन ( **Thermal Scanner / Gun** ) याद्वारे तपासणी करण्याची व्यवस्था करण्यात यावी. तसेच प्रवाश्यांच्या हातावर १४ दिवस **Home Quarantine** बाबतचा शिक्का मारण्यात यावा. जर प्रवाश्यांमध्ये कोविड - १९ ची लक्षणे आढळून आल्यास अशा प्रवाश्यांना त्वरित जवळील कोविड केअर सेंटर किंवा रूग्णालय यामध्ये स्थलांतरित करण्याची व्यवस्था करण्यात यावी.
- स्थानिक आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांनी सर्व स्थानकावर पिंपरी चिंचवड **आयुक्तालयाच्या हद्दीत** येणाऱ्या प्रवाश्यांचे **Rapid Antigen Test ( RAT )** करणेकरिता मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतील ( Testing Lab ) तंत्रज्ञांची नियुक्ती करावी. कोविड – १९ चाचणी करिता लागणारा खर्च हा संबंधित प्रवाशी यांनी करावा.

५) उपरोक्त आदेश तसेच इकडील दि.१४.०४.२०२१,दि.१७.०४.२०२१ व दि. २०.०४.२०२१ रोजी निर्गमित केलेले आदेश / मार्गदर्शक सूचना कायम राहतील.

कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी केंद्र सरकार / राज्य शासन आणि या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे, मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० तसेच भारतीय दंड संहितेचे कलम १८८ नुसार, अन्य कायदेशीर तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी दि. २२.०४.२०२१ रोजी दिलेला आहे.

**(कृष्ण प्रकाश)** भापोसे
**पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड,**
**पोलीस आयुक्तालय**